just mumbai
पुण्य नगरी
बुधवार, ४ एप्रिल २०१२

# विश्वेश्वरानंद, टिबडेवाला व सांगानेरिया यांना डी.लिट.

**मुंबई :** झुंझुनुस्थित जगदीशप्रसाद झाबरमल टिबडेवाला विद्यापीठ असलेल्या श्री राजस्थानी सेवा संघाच्या स्थापनेला ६ एप्रिल २०१२ रोजी ५० वर्षे पूर्ण होत आहे. या निमित्ताने विद्यापीठाकडून महामंडलेश्वर स्वामी विश्वेश्वरानंद गिरीजी महाराज, संघाचे अध्यक्ष व विश्वस्त उच्चशिक्षाविभूषित विनोद टिबडेवाला व लेखक सांवरमाल सांगानेरिया यांना प्रतिष्ठेचा डी. लिट पदवी देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. विलेपार्ले येथील भाईदास सभागृहात दिवसभरात तीन सत्रात चालणाऱ्या या कार्यक्रमात संतांना सन्मानित केल्यानंतर त्यांच्या आशीर्वचनांचा कार्यक्रम होणार आहे. त्यानंतर संघाच्या संस्थेत प्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव केला जाणार आहे. उद्योगक्षेत्रात भरीव कामगिरी करणाऱ्यांना देखील यावेळी सन्मानित केले जाणार आहे. तसेच राजस्थानी आणि महाराष्ट्राच्या इतिहासाचे दर्शन देणारी नृत्यनाटिका यावेळी सादर केली जाणार आहे. याप्रसंगी तीन राज्यांचे राज्यपाल, अनेक मंत्रीगण, शिक्षक, लेखक, पत्रकार तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार असल्याची माहिती संघाने दिली.